माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ :- ४१५१ / २०२३ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| विजय रमेश सोनवणे | ग्रामविकास अधिकारी, मु.पो. मुरूम, ता.बारामती, जि.पुणे | विस्तार अधिकारी, पंचायत समिती बारामती, ता.बारामती, जि.पुणे |

**( सुनावणी दिनांक - १८/०६ /२०२५ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि.१२.०७.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी विद्यमान तथा तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी यांनी दि.३०.०१.२०२३ च्या माहिती अर्जात दि.१८.०६.२०२२ रोजीचा तक्रार अर्जानुसार सिटी सर्वे गट नं ५४३ मोजणी कागदपत्रे मिळणे इ.माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान जनमाहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थीला दि.०५.०६.२०२३ च्या पत्राने माहिती दिली आहे व अपिलार्थी यांची पोहोच प्राप्त आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन दि.०५.०६.२०२३ रोजी माहिती दिली असल्याने प्रथम अपिल निकाली काढले असलेचा निर्णय पारित केला आहे.

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीला दि.०५.०६.२०२३ च्या पत्राने माहिती दिली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०५.०६.२०२३ रोजीच्या निकालपत्रामध्ये अपिल निकाली काढले असलेने, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुतचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ४१५१ / २०२३ / पुणे 9/28/2025

दिनांक - 2/9/2025